RNI No. MAHBIL/2012/48433
www.dgps.maharashtra.gov.in.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक – पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १४, अंक - ३२] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट ७ - १३, २०२५ / श्रावण १६ - २२, शके १९४७ [पृष्ठे-१२३

प्राधिकृत प्रकाशन

शासकीय/संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

अधिसूचना

क्रमांक प्रा.यो.पुणे/मौ.वनपुरी/ता.पुरंदर/ग.नं.१८/कलम २०(४)/सहसंपुवि/१०७२/२०२५.— ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे ज्यास "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या जमीन वापराच्या फेरबदलासंदर्भाने करावयाच्या कार्यपद्धतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये, शासन निर्णय क्र. टीपीएस-१८१५/प्र.क्र.४९/१५/नवि-१३, दिनांक ६ मे २०१५ व दिनांक ४ जानेवारी २०१६ अन्वये शासनाने निदेश दिलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, मौजे वनपुरी, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे येथील गट नंबर १८ मधील एकूण क्षेत्र १२.५६ हे. आर क्षेत्र मंजूर पुणे प्रादेशिक योजनेमध्ये "शेती तथा ना-विकास" विभागात समाविष्ट असून सदर क्षेत्राचा (यात यापुढे ज्यास "उक्त क्षेत्र" असे संबोधले आहे) विभाग बदलाचा प्रस्ताव श्रीमती अश्विनी धनंजय जगदाळे व इतर यांनी दिनांक २२ ऑगस्ट २०२३ रोजी या कार्यालयास सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, सूचना क्रमांक प्रा.यो.पुणे/मौ.वनपुरी/ता.पुरंदर/ग.नं.१८/कलम २०(३)/सहसंपुवि/१६४५, दिनांक २५ सप्टेंबर २०२४ अन्वये, उक्त क्षेत्र "रहिवास" विभागात समाविष्ट करणेकरिता राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या उक्त अधिनियमाच्या कलम २०(३) अन्वयेच्या सूचनेस अनुसरून प्राप्त होणाऱ्या सूचना / हरकतींवर संबंधितांना सुनावणी देऊन अहवाल सादर करणेकरिता सहायक संचालक, नगर रचना, बारामती शाखा, बारामती यांना नियुक्त करण्यात आले होते (यात यापुढे ज्यास "उक्त अधिकारी" असे संबोधले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने संपूर्ण वैधानिक कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून, सदर फेरबदलाबाबत विहित मुदतीत एकही हरकत / सूचना प्राप्त नसल्याचे उक्त अधिकारी यांनी कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजीचे प्रस्ताव छाननी समितीच्या बैठकीत सोबतच्या नकाशात दर्शविल्यानुसार व काही अटीसापेक्ष उक्त क्षेत्र "शेती तथा ना-विकास" विभागातून वगळून "रहिवास" विभागात समाविष्ट करणेचा निर्णय "प्रस्ताव छाननी समिती" चे बैठकीमध्ये झालेला आहे ;

आणि ज्याअर्थी, जमीनधारकांनी यासंबंधाने आवश्यक छाननी शुल्क, प्रसिद्धी शुल्क व अधिमूल्य रकमेचा भरणा शासकीय कोषागारात केला आहे.

आता त्याअर्थी, शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे हे उक्त अधिनियमाचे कलम २० पोट-कलम ४ अन्वये उक्त प्रस्तावित फेरबदलास मंजुरी देत आहेत आणि त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजुरीच्या दिनांक २५ नोव्हेंबर १९९७ च्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या फेरबदलाच्या अनुसूचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर, खालीलप्रमाणे बदलाची नोंद घेण्याचे निदेश देत आहे.

नोंद

पुणे मंजूर प्रादेशिक योजनेतील, मौजे वनपुरी, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे येथील गट नंबर १८ मधील एकूण क्षेत्र १२.५६ हे. आर इतके क्षेत्र जमिनींचा वापर, सोबतच्या भाग नकाशात दर्शविल्यानुसार खालील अटींच्या अधीन राहून "शेती तथा ना-विकास" विभागातून वगळून "रहिवास" विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

(१) शासन निर्णय, दिनांक ६ मे २०१५ व दिनांक ४ जानेवारी २०१६, तसेच या अनुषंगिक शासन निर्णयातील सर्व अटी / शर्ती, जमीनधारक / विकसक यांचेवर बंधनकारक राहतील.

(२) जिल्हाधिकारी, पुणे, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, पुणे, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, पुणे, मुख्य अभियंता, जलसंपदा, प्रादेशिक विभाग, पुणे व सहायक संचालक, बारामती शाखा, बारामती यांचे अनुक्रमे दिनांक १२ मार्च २०२४, दिनांक ९ जानेवारी २०२४, दिनांक १५ फेब्रुवारी २०२४, दिनांक ७ जून २०२४, व दिनांक १३ सप्टेंबर २०२३ रोजीच्या पत्रातील अटी जमीनधारक / विकसक यांचेवर बंधनकारक राहतील.

(३) PMRDA च्या सद्य:स्थितीत लागू असलेल्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार आवश्यक १० टक्के खुली जागा क्षेत्राव्यतिरिक्त १५ टक्के क्षेत्र सुविधा भूखंड स्वरूपात राखून ठेवणे व सुविधा भूखंडातील किमान १ एकर क्षेत्रात दवाखाना व २ एकर क्षेत्र प्राथमिक शाळा या वापराकरिता विकसित करणे व उर्वरित सुविधा भूखंड क्षेत्र उक्त विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय वापराकरिता विकसित करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

(४) प्रस्तावाखालील जागा ही प्रस्तावित पुरंदर विमानतळाजवळ असल्याने, या विषयी संबंधित प्राधिकरणाचे नियम / बंधणे, अर्जदार / विकसक यांचेवर बंधनकारक राहतील.

(५) सदर प्रस्ताव सादर करतेवेळी दिनांक ६ मे २०१५ रोजीच्या शासन निर्णयासोबतचे अनुसूची 'क' नुसार दिनांक १ नोव्हेंबर २०२३ रोजी सादर केलेल्या हमीपत्रानुसार मान्य अटींचे पालन करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

मंजूर फेरबदलाखालील जमिनी दर्शविणारा भाग नकाशा, सहायक संचालक, नगर रचना, बारामती शाखा, बारामती यांचे कार्यालयात, नागरिकांच्या अवलोकनार्थ कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

रा. म. पवार,
सदस्य सचिव,
प्रस्ताव छाननी समिती तथा
पुणे, २५ जुलै २०२५. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

BY MEMBER SECRETARY, PROPOSAL SCRUTINY COMMITTEE AND JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING, PUNE DIVISION, PUNE

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

NOTIFICATION

No. R.P.Pune/Mou.Vanpuri/Tal.Purandar/G.No.18/Section 20*(4)*/JDTP/1072/2025.— Whereas, the Government *vide* Resolution No. TPS-1815/CR-49/15/UD-13, dated 6th May 2015 and 4th January 2016 has issued directives under Section 154 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “the said Act”) regarding the procedure to be followed under Section 20 of the said Act, for making changes in the use of land falling in the areas of sanctioned Regional Plan under the said Act ;

and whereas, total area admeasuring about 12.56 Hectare. bearing Gat No. 18 of Mouje Vanpuri, Taluka Purandar, District Pune is included in “Agriculture / No Development Zone” as per sanctioned Regional Plan of Pune of which zone change proposal is submitted by Smt. Ashwini Dhananjay Jagdale and others (hereinafter referred to as “the said Land”) ;

and whereas, a Notice No. R.P. Pune/Mou.Vanpuri/Tal.Purandar/G.No.18/ Section 20*(3)*/JDTP/922/1645, dated 25th September 2024 has been published under Section 20 *(3)* of the said Act, for inviting suggestions and objections, for including the said Land into “Residential Zone” and authorised the Assistant

Director of Town Planning, Baramati Branch, Baramati (hereinafter referred to as the "said Officer") to submit a report after giving hearing to the suggestions / objections so received in response to the notice under Section 20 *(3)* of the said Act, to be published in Maharashtra Government Gazettee as well as local news papers ;

and whereas, the said Officer had submitted a report stating that, all legal procedure stipulated in the said Act had been completed and No suggestions / objections had been received within the stipulated period about the said Modification ;

and whereas, after considering the report submitted by the said Officer in its meeting dated 28th January 2025, the Proposal Scrutiny Committee has made a decision to include the said Land into "Residential Zone" as shown on plan subject to certain conditions ;

and whereas the said Land owners have paid the requisite processing fees, advertisement charges and Premium amount in the Government Treasury.

Now therefore, under the powers delegated by the Government, the Joint Director of Town Planning, Pune Division, Pune hereby sanctions the Modification under sub-section 4 of Section 20 of the said Act and for that purpose directs that, in the Schedule of Modifications appended to the Notification dated 25th November 1997 sanctioning the said Regional Plan, after the last entry, the following new entry shall be added.

ENTRY

In the Sanctioned Regional Plan of Pune the land bearing Gat. No. 18 of Mouje Vanpuri, Taluka Purandar, District Pune, total area admeasuring 12.56 Ha. is deleted from "Agriculture / No Development Zone" and included in "Residential Zone" as shown on the plan, subject to the following conditions.

(1) The terms and conditions laid down in the said Government Resolutions dated 6th May 2015, 4th January 2016 are binding on the land owner / developer.

(2) Conditions prescribed by the Collector, Pune, Chief Engineer, Maharashtra Jeevan Pradhikaran, Region, Pune, Chief Engineer, Public Works, Region Pune, Chief Engineer, Irrigation, Region Pune and Assistant Director of Town Planning, Baramati Branch, Baramati respectively in the letters dated 12th March 2024, 9th January 2024, 15th February 2024, 7th June 2024 and 13th September 2023 shall be binding on the landowner / developer.

(3) Providing 10 per cent Open Space along with 15 per cent Amenity Space is required to be reserved in the form of amenity plots and atleast 1 acre of Hospital and atleast 2 acre as Primary School shall be developed. It shall be binding on the the land owner / developer to develop the remaining Amenity Space for permissible uses as per prevailing Development Control Regulations of Pune Metropolitan Region Development Authority.

(4) The said Land is in the vicinity of proposed Purandar Airport area, therefore the regulations / restrictions of the concerned Authority shall be binding on the Land owner / Developer.

(5) The terms and conditions accepted by the applicant *vide* the affidavit submitted on dated 1st November 2023 as per Annexure 'C' of the said Government Resolution dated 6th May 2015 shall be binding on the applicant.

The Part Plan showing the lands under the sanctioned Modification shall be made available for inspection to the general public, in the office of Assistant Director of Town Planning, Baramati Branch, Baramati.

R. M. PAWAR,
Member Secretary,
Proposal Scrutiny Committee and
Joint Director of Town Planning, Pune Division, Pune.

Pune, 25th July 2025.

जिल्हाधिकारी यांजकडून

जिल्हा पुणे

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांनी केलेली अंतिम घोषणा.

नमुना १-अ

अधिसूचना

क्रमांक पीएलए/कावि/१३१३/२०२५.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यात यापुढे "उक्त नगर रचना अधिनियम" म्हणून संबोधिलेला) च्या कलम ३१, पोट-कलम *(१)* अन्वये, पुणे महानगरपालिकेची वाढीव हद्दीची विकास योजना (यात यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली) अधिसूचना, शासन अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८०७/३९/प्र.क्र.१०७०(ए)/०७/नवि-१३, दिनांक १८ सप्टेंबर २००८ अन्वये भागश: मंजूर झाली असून, ती दिनांक १ नोव्हेंबर २००८ पासून अमलात आलेली आहे. सदरहू अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक--पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक २ ऑक्टोबर २००८ रोजी पृष्ठे ३६२५ ते ३६२७ वर प्रसिद्ध झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूची-एकमध्ये नमूद केलेल्या जमिनी (यात यापुढे "उक्त जमिनी" म्हणून संबोधिलेल्या) मौजे बालेवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील सर्व्हे नंबर १७/५/५, १७/५/६, १७/४/७ येथील विकास योजनेत प्लेग्राउंड (पी.जी.-२) या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित आहेत (यात यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधिलेल्या) ;

आणि ज्याअर्थी, पुणे महानगरपालिकेने (यात यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली) उक्त नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार नियोजन प्राधिकरण म्हणून मा. महानगरपालिका आयुक्त, पुणे यांचेकडील दिनांक २० एप्रिल २०२० रोजीच्या मान्यतेनुसार उक्त नगर रचना अधिनियमाचे कलम १२७ चे खरेदी सूचनेच्या अनुषंगाने व उक्त नगर रचना अधिनियमांचे कलम १२६, पोट-कलम *(१)* अन्वये उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे दिनांक २८ ऑक्टोबर २०२० रोजी पत्र क्रमांक एलएएम/ओ/५६८ अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने, उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १५१, पोट-कलम *(१)* खाली काढलेली अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१७५/५१०५/नवि-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये उक्त मंजूर सुधारित विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनींच्या संपादनाबाबतच्या उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(१), (२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या-त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, संपादनाखालील क्षेत्र मंजूर विकास योजनेतील रस्त्याच्या आखणीनुसार संपादित होत असल्याबाबत खातरजमा करण्याची जबाबदारी, तसेच रस्त्याची आखणी व संपादनांतर्गत जागेच्या हद्दीबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पुणे महानगरपालिकेची आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२५ मध्ये सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ५ *(१)* अन्वये दाखल मजकूर व ५ *(२)* अन्वये दाखल परंतुकानुसार उक्त महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनींचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यात यापुढे "उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३" म्हणून संबोधलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्हीसह) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, अशा जमिनींचे संबंधात लागू होणार नाहीत, तसेच महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने जा.क्र. टीपीएस-१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये, "उक्त नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम १२५ ते १२६ मधील तरतूद विचारात घेता नवीन भूसंपादन कायद्यातील कलम ११ *(१)* कलम १६ ते १८ यासोबतच परिशिष्ट दोन व तीन, तसेच या अनुषंगिक कलमे लागू होणार नाहीत", अशा सूचना दिल्या आहेत आणि म्हणून यासोबतच्या अनुसूची-तीनमधील पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन व अनुसूची चारमधील पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश या अनुसूची लागू नाही ;

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या विकास योजनेत पुणे, मौजे बालेवाडी, तालुका हवेली येथील प्लेग्राउंड (पी.जी.-२) या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित केलेल्या उक्त जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे अशी मा. जिल्हाधिकारी, पुणे यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनींच्या संपादनापोटी द्यावयाच्या उक्त भूसंपादन अधिनियमानुसारची नुकसान भरपाईची संपूर्णत: रक्कम व तद्अनुषंगिक भूसंपादनाच्या खर्चाची रक्कम संपूर्णपणे उक्त पुणे महानगरपालिकेने अदा करावयाची आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनींच्या संपादनापोटी द्यावयाच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम *(२)* मध्ये विनिर्दिष्ट केलेली घोषणा करावयाची कालमर्यादा उलटून गेलेली आहे ;

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने, उक्त नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५१, पोट-कलम *(१)* अन्वयेची अधिसूचना क्र. टीपीएस-२१७५/५१०५/नवि-७, दिनांक ३ मार्च १९७९ नुसार शासनाने प्रदत्त केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि उक्त नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम *(४)* सह उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ च्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदीन्वये जिल्हाधिकारी, पुणे असे घोषित करतात की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये तपशीलवार वर्णन केलेल्या व अनुसूची दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

उक्त भूसंपादन अधिनियमाच्या कलम ३ *(ग)* अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त भूसंपादन अधिनियमान्वये उक्त जमिनींच्या संबंधात यापुढे करावयाच्या संपादनाच्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्याकरिता, विशेष भूमी संपादन अधिकारी, क्रमांक १६, पुणे, पत्ता :- तिसरा मजला, पुणे महानगरपालिका क्षेत्रीय कार्यालय, हिराबाग चौक, टिळक रोड, पुणे-४११ ००२ (यात यापुढे "भूसंपादन अधिकारी" म्हणून संबोधिलेला) यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

जिल्हा पुणे, तालुका हवेली, गावाचे नाव - मौजे बालेवाडी

अ.क्र.	मिळकतीचा सर्व्हे नंबर	भूसंपादनाखालील क्षेत्र (चौ.मी.)	चतु:सीमा			
			उत्तरेस	दक्षिणेस	पूर्वेस	पश्चिमेस
१	२	३	४	५	६	७
१.	१७/५/५	५००.००	सर्व्हे नं. १७ पै.	सर्व्हे नं. १७ पै.	सर्व्हे नं. १७/५/६	सर्व्हे नं. १७ पै.
२.	१७/५/६	५००.००	सर्व्हे नं. १७ पै.	सर्व्हे नं. १७ पै.	सर्व्हे नं. १७ पै.	सर्व्हे नं. १७/५/५
३.	१७/४/७	५००.००	सर्व्हे नं. १७ पै.	सर्व्हे नं. १७ पै.	सर्व्हे नं. १७ पै.	सर्व्हे नं. १७ पै.

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : पुणे, मौजे बालेवाडी येथील सर्व्हे नंबर १७/५/५, १७/५/६, १७/४/७, "प्लेग्राउंड (पी.जी.-२)" ने आरक्षित जागेचे भूसंपादन करणेबाबत.

प्रकल्पाच्या कामाचे वर्णन : विकास योजनेतील प्लेग्राउंड (पी.जी.-२)

समाजाला होणारा लाभ : पायाभूत सुविधा, सोयी-सुविधा (पायाभूत सुविधा, सोयी-सुविधा याबाबत व इतर लाभांसंबंधात).

प्रकल्पाखालील जागेची सद्य:स्थिती. : जागा मोकळी आहे.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

जिल्हा पुणे, तालुका हवेली, गावाचे नाव - मौजे बालेवाडी

अ. क्र.	मिळकतीचा सर्व्हे नंबर	भूसंपादनाखालील क्षेत्र (चौ.मी.)
१	२	३

लागू नाही.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने जा. क्रमांक टीपीएस-१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये "उक्त नगर रचना अधिनियमामधील तरतुदीनुसार सुरू करण्यात आलेल्या भूसंपादन प्रकरणांमध्ये उक्त अधिनियमातील कलम १२५ ते १२६ मधील तरतूद विचारात घेता नवीन भूसंपादन कायद्यातील कलम ११ *(१)* कलम १६ ते १८ यासोबतच परिशिष्ट - दोन व तीन, तसेच यानुषंगिक कलमे लागू होणार नाहीत" अशा सूचना दिल्या आहेत.

अनुसूची - चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

लागू नाही

टीप :- उक्त जमिनींच्या नकाशाचे निरीक्षण विशेष भूमी संपादन अधिकारी, क्रमांक १६, पुणे महानगरपालिका क्षेत्रीय कार्यालय इमारत, तिसरा मजला, स्टेट बँक ऑफ इंडियाचेवर, टिळक रस्ता, पुणे-४११ ००२ या कार्यालयात निरीक्षण करता येऊ शकेल.

जितेंद्र डूडी,

पुणे, २३ जुलै २०२५. जिल्हाधिकारी, पुणे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांजकडून

अधिसूचना

क्रमांक कार्या-७/गृह-१/आरआर/१४९४/२०२५.— ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांनी माझे निदर्शनास असे आणून दिले आहे की, श्री क्षेत्र जोतिबा (वाडी रत्नागिरी), तालुका पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर येथे दिनांक ३० जुलै २०२५ ते दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी अखेर पावेतो श्री क्षेत्र चोपडाईदेवीची श्रावण षष्ठी यात्रा संपन्न होत आहे. सदर कालावधीत महाराष्ट्र राज्यातून व इतर राज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक आपआपल्या मोटार वाहनांनी जोतिबा डोंगरावर ये-जा करीत असतात. जोतिबा डोंगरावर येणाऱ्या मोटार वाहनांची प्रचंड संख्या, वाडी रत्नागिरी जोतिबा डोंगर येथील पार्किंगच्या जागेची उपलब्धता आणि भौगोलिक परिस्थिती पाहता रहदारीच्या प्रमुख मार्गावर मोटार वाहनांचे पार्किंग होऊन वाहतुकीची कोंडी / समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भाविकांची सुरक्षा व मोटार वाहतूक सुरळीत, सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे व त्याकरिता यात्रा काळात वाडी रत्नागिरी जोतिबा डोंगर येथे मोटार वाहनांची रहदारी आणि यात्रा कार्यक्रम सुरक्षितरीत्या पार पाडण्यासाठी रहदारीचे नियमन करणे आवश्यक आहे.

वर नमूद केलेप्रमाणे चोपडाईदेवीची यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी वर नमूद वाहतुकीची परिस्थिती विचारात घेऊन या मार्गावरील दानेवाडी फाटा क्रॉसिंग ते जुने आंब्याचे झाड ते प्रवासी टोल नाक्याजवळील नवीन एस.टी. बसस्थानक रोड ते जुने एस.टी. स्टँड रोड ते सेंट्रल प्लाझा समोरील रोड ते पी.डब्ल्यू.डी. रेस्ट हाऊस समोरील रोड ते यमाई मंदिर कॉर्नर ते गिरोली घाट ते गिरोली फाटा (श्रावणी हॉटेल) या दरम्यान वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतुकीचे नियमन करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री करून देण्यात आली आहे.

त्याअर्थी, मी, अमोल येडगे (भा.प्र.से.), जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर याद्वारे महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम ३३ *(१) (क)* प्रमाणे मला प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून, श्री क्षेत्र जोतिबा, वाडी रत्नागिरी, तालुका पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर मार्गावरील दानेवाडी फाटा क्रॉसिंग ते जुने आंब्याचे झाड ते प्रवासी टोल नाक्याजवळील नवीन एस.टी. बसस्थानक रोड ते जुने एस.टी. स्टँड रोड ते सेंट्रल प्लाझा समोरील रोड ते पी.डब्ल्यू.डी. रेस्ट हाऊस समोरील रोड ते यमाई मंदिर कॉर्नर ते गिरोली घाट ते गिरोली फाटा (श्रावणी हॉटेल) या दरम्यानचे मार्गावर सर्व प्रकारच्या मोटार वाहनांना रस्त्यांच्या दोन्ही बाजूस पार्किंग करणेस मनाई करीत आहे.

ही अधिसूचना दिनांक ३० जुलै २०२५ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी यात्रा संपेपर्यंत अमलात राहील. या आदेशाची जो कोणी उल्लंघन करील तो कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

उपरोक्त अधिसूचना दिनांक २८ जुलै २०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी पारित करण्यात येत आहे.

अमोल येडगे (भा.प्र.से.),

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,

कोल्हापूर, २८ जुलै २०२५. कोल्हापूर.

मुख्याधिकारी यांजकडून

जयसिंगपूर नगरपरिषद, जयसिंगपूर

अधिसूचना

क्रमांक ज.न.प./आवि-३८७९/२०२५-२६.— ज्याअर्थी, जनहित याचिका क्रमांक १७३/२०१०, डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर या अनुषंगाने ध्वनी प्रदूषणअधिनियम, २००० ची अंमलबजावणी करणेकामी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने नगरपरिषद हद्दीतील शाळा, दवाखाने व न्यायालये असणाऱ्या ठिकाणी किमान १०० मीटर परिसरामध्ये शांतता क्षेत घोषित करणेच्या अनुषंगाने जयसिंगपूर नगरपरिषद हद्दीमध्ये शांतता क्षेत्र (Silent Zone) निश्चित करणेसाठी जयसिंगपूर नगरपरिषदेने मा. प्रशासकीय समिती ठराव नंबर ३, दिनांक ७ एप्रिल २०२५ अन्वये खालील नमूद तक्त्याप्रमाणे शांतता क्षेत्रे म्हणून ठराव पारित करणेतआला आहे. घोषित केलेली ठिकाणे नगरपरिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेली असून शांतता क्षेत्र दर्शविणारे फलक लावणेत आलेले आहेत.

परिशिष्ट

जयसिंगपूर नगरपरिषद, जयसिंगपूर

शांतता क्षेत्र ठिकाणे

अ.क्र.	ध्वनी प्रदूषण नियमातील तरतुदीनुसार क्षेत्राचा तपशील (संपूर्ण पत्ता, पिनकोड व सर्व्हे नंबरसह)	विकास आराखड्यानुसार क्षेत्राची वर्गवारी (औद्योगिक/वाणिज्य/ रहिवासी/विशेष राखीव (उदा. हॉस्पिटल, शाळा, कोर्ट, कॉलेज इत्यादीसाठी राखीव भूखंड	जेथे विकास आराखड्यानुसार एकापेक्षा अधिक क्षेत्रे एकत्र येत असतील त्या क्षेत्राची वर्गवारी नमूद करावी (मिश्र झोन असल्यास) रहिवास, वाणिज्य, औद्योगिक वापर एकत्र असेल अशी ठिकाणे	स्तंभ क्र. ४ मध्ये नमूद क्षेत्रापैकी जास्त वापर असलेले क्षेत्र असेल ती वर्गवारी	शासन निर्णय, पर्यावरण विभाग, दि. २० नोव्हेंबर २०१७ नुसार आवाजाच्या मर्यादेनुसार क्षेत्राची वर्गवारी-ड शांतता (४०-५०DB)	औद्योगिक/वाणिज्यिक/ रहिवासी इत्यादी मिश्र क्षेत्रात एखादे महत्त्वाचे रुग्णालय/शैक्षणिक/ न्यायालयीन इमारत येत असल्यास त्याबाबत असे क्षेत्र स्तंभ ६ नुसार कोणत्या क्षेत्रात ठेवावे याबाबत अभिप्राय	वेगळे अभिप्राय असल्यास नमूद करावे.
१	२	३	४	५	६	७	८
१.	मोदी हॉस्पिटल, जनतारा हायस्कूल.	रहिवासी/विशेष राखीव	रहिवासी/विशेष राखीव	रहिवासी/विशेष राखीव	मोदी हॉस्पिटल, जनतारा हायस्कूल.	मोदी हॉस्पिटल, जनतारा हायस्कूल-क.	
२.	जयसिंगपूर कोर्ट (दिवाणी न्यायालय) व प्राथमिक आरोग्य केंद्र.	रहिवासी/विशेष राखीव	रहिवासी/विशेष राखीव	रहिवासी/विशेष राखीव	जयसिंगपूर कोर्ट (दिवाणी न्यायालय) व प्राथमिक आरोग्य केंद्र.	जयसिंगपूर कोर्ट (दिवाणी न्यायालय) व प्राथमिक आरोग्य केंद्र-ड.	
३.	डॉ. आवळेकर हॉस्पिटल ते डॉ. सुरेश पाटील हॉस्पिटल (काडगे मळा परिसर).	रहिवासी/विशेष राखीव	रहिवासी/विशेष राखीव	रहिवासी/विशेष राखीव	डॉ. आवळेकर हॉस्पिटल ते डॉ. सुरेश पाटील हॉस्पिटल (काडगे मळा परिसर).	डॉ. आवळेकर हॉस्पिटल ते डॉ. सुरेश पाटील हॉस्पिटल (काडगे मळा परिसर)-क.	

परिशिष्ट--*चालू*

१	२	३	४	५	६	७
४.	डॉ. सतीश पाटील ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, सांगली-कोल्हापूर रोड.	रहिवासी	रहिवासी	रहिवासी	डॉ. सतीश पाटील ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, सांगली-कोल्हापूर रोड.	डॉ. सतीश पाटील ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, सांगली-कोल्हापूर रोड-क.
५.	डॉ. जे. जे. मगदूम आयुर्वेद मेडिकल कॉलेज ते झेले हायस्कूल.	रहिवासी / विशेष राखीव	रहिवासी / विशेष राखीव	रहिवासी / विशेष राखीव	डॉ. जे. जे. मगदूम आयुर्वेद मेडिकल कॉलेज ते झेले हायस्कूल.	डॉ. जे. जे. मगदूम आयुर्वेद मेडिकल कॉलेज ते झेले हायस्कूल-क.
६.	ल. पा. गर्ल्स हायस्कूल, गट नंबर ६.	रहिवासी / विशेष राखीव	रहिवासी / विशेष राखीव	रहिवासी / विशेष राखीव	ल. पा. गर्ल्स हायस्कूल, गट नंबर ६.	ल. पा. गर्ल्स हायस्कूल, गट नंबर ६-क.
७.	नवजीवन हायस्कूल, गट नंबर ९.	रहिवासी / विशेष राखीव	रहिवासी / विशेष राखीव	रहिवासी / विशेष राखीव	नवजीवन हायस्कूल, गट नंबर ९.	नवजीवन हायस्कूल, गट नंबर ९-क.
८.	न्यू इंग्लिश मीडियम स्कूल	रहिवासी / विशेष राखीव	रहिवासी / विशेष राखीव	रहिवासी / विशेष राखीव	न्यू इंग्लिश मीडियम स्कूल	न्यू इंग्लिश मीडियम स्कूल-क
९.	मालू हायस्कूल, डॉ. बी. एस. पाटील हॉस्पिटल व अण्णासाहेब पाटील हॉस्पिटल.	विशेष राखीव रहिवासी रहिवासी	विशेष राखीव रहिवासी रहिवासी	विशेष राखीव रहिवासी रहिवासी	मालू हायस्कूल, डॉ. बी. एस. पाटील हॉस्पिटल व अण्णासाहेब पाटील हॉस्पिटल.	मालू हायस्कूल, डॉ. बी. एस. पाटील हॉस्पिटल व अण्णासाहेब पाटील हॉस्पिटल-क.
१०.	शाळा नंबर ३, स्टेशन रोड	रहिवासी / विशेष राखीव	रहिवासी / विशेष राखीव	रहिवासी / विशेष राखीव	शाळा नंबर ३, स्टेशन रोड	शाळा नंबर ३, स्टेशन रोड-क.

मुख्याधिकारी,

जयसिंगपूर, २३ जुलै २०२५.

जयसिंगपूर नगरपरिषद, जयसिंगपूर.

अपर निबंधक, सहकारी संस्था यांजकडून

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये

आदेश

क्रमांक ना.बँका/१-सआ/सोलापूर सिद्धेश्वर बँक/का.क.-१५६/१३५६/२०२५.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, मिलिंद आकरे, अपर निबंधक (तपासणी व निवडणूक) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँक लि., सोलापूर या बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी कलम ९८ व कलम १०१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्रांची अंमलबजावणीबाबत करावयाच्या कार्यवाहीपुरती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार खालील अटींस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते ३१ मार्च २०२६ पर्यंत शक्ती प्रदान करीत आहे.

परिशिष्ट

अ.क्र.	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्यांचे नाव	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्यांचा हुद्दा	शक्तीची व्याप्ती	कार्यक्षेत्र जिल्हा
१	२	३	४	५
१.	श्री. प्रभुलिंग विश्वनाथ गोटे	अधिकारी	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
२.	श्री. सुनील वसंतराव कोळेकर	अधिकारी	वसुली अधिकारी	सोलापूर व पुणे
३.	श्री. मल्लिनाथ रामचंद्र पुजारी	अधिकारी	वसुली अधिकारी	लातूर व उस्मानाबाद
४.	सौ. माधवी नितीन लंगोटे	अधिकारी	वसुली अधिकारी	सोलापूर जिल्हा
५.	श्री. राजेश विठ्ठल खेडगीकर	अधिकारी	वसुली अधिकारी	सोलापूर जिल्हा
६.	श्री. प्रवीण सिद्रामय्या स्वामी	अधिकारी	वसुली अधिकारी	सोलापूर जिल्हा
७.	श्री. संतोष सिद्धेश्वर बिराजदार	अधिकारी	वसुली अधिकारी	सोलापूर जिल्हा

अटी.—

१. वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा, कलम ९८ व १०१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

३. वसुली अधिकारी यांनी या कार्यालयाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार दरमाह विहित नमुन्यात कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना सादर करावी.

४. वसुली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सदर व्यक्ती सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सदर व्यक्तीस सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

६. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १५०४/प्र. क्र. २३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहांच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ६ जून २०१९ मध्ये निश्चित केलेल्या बँकेच्या नावाच्या मोहरेचा वापर करण्यात यावा.

७. वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हिल कोर्ट" "एक्झिक्युटिव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

८. वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "वसुली अधिकारी, सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँक लि., सोलापूर" असा फलक लावता येईल.

९. वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या / जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांच्याकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे, त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१०. वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ आणि त्याखालील नियम १०७ अन्वये आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

११. या कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या परिपत्रकीय सूचनांचे वसुली अधिकारी यांनी तंतोतंत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमाह वसुली अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाचमध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

१२. वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटिस / आदेश / घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा. वसुली अधिकारी यांनी नोटिस बजावताना नोटिसीमध्ये त्यांचे नाव, पदनाम व भ्रमणदूरध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

१३. वसुली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तींनी किमान तीन वर्षांतून एकदा मान्यता प्राप्त संस्थेकडून तीन दिवसांचे वसुलीचे प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.

मिलिंद आकरे,

अपर निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था,

पुणे, २८ मे २०२५. महाराष्ट्र राज्य, पुणे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये

आदेश

क्रमांक ना.बँका/१-सआ/समर्थ बँक/का.क.-१५६/१४२८/२०२५.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, मिलिंद आकरे, अपर निबंधक (तपासणी व निवडणूक) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर या बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी कलम ९८ व कलम १०१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्रांची अंमलबजावणीबाबत करावयाच्या कार्यवाहीपुरती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार खालील अटींस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते ३१ मार्च २०२६ पर्यंत शक्ती प्रदान करीत आहे.

परिशिष्ट

अ.क्र.	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्यांचे नाव	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्यांचा हुद्दा	शक्तीची व्याप्ती	कार्यक्षेत्र जिल्हा
१	२	३	४	५
१.	श्री. रंगदाळ श्रीकांत केशव	चिफ जनरल मॅनेजर	वसुली अधिकारी	सोलापूर
२.	श्री. कुलकर्णी अरुण हरिभाऊ	जनरल मॅनेजर	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
३.	श्री. हिप्परगे संगमेश्वर मल्लीकार्जुन	डेप्युटी मॅनेजर	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
४.	श्री. लोंढे नंदकुमार बाबूराव	डेप्युटी मॅनेजर	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
५.	श्री. अमेय अनंत करमरकर	सिनीअर ऑफिसर	वसुली अधिकारी	पुणे व मुंबई
६.	श्री. दिवसे चंद्रशेखर मधुकर	सिनीअर ऑफिसर	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
७.	श्री. अमोल मधुकर कुलकर्णी	ज्यु. ऑफिसर	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
८.	श्री. मयुर राजू कुडाळकर	अ.ज्यु. ऑफिसर	वसुली अधिकारी	कोल्हापूर व सांगली

अटी.—

१. वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा, कलम ९८ व १०१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

३. वसुली अधिकारी यांनी या कार्यालयाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार दरमाह विहित नमुन्यात कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना सादर करावी.

४. वसुली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सदर व्यक्ती सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सदर व्यक्तीस सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

६. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १५०४/प्र. क्र. २३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहांच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ६ जून २०१९ मध्ये निश्चित केलेल्या बँकेच्या नावाच्या मोहरेचा वापर करण्यात यावा.

७. वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हिल कोर्ट" "एक्झिक्युटिव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

८. वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "वसुली अधिकारी, समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर" असा फलक लावता येईल.

९. वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या / जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांच्याकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे, त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१०. वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ आणि त्याखालील नियम १०७ अन्वये आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

११. या कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या परिपत्रकीय सूचनांचे वसुली अधिकारी यांनी तंतोतंत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमाह वसुली अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाचमध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

१२. वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटिस / आदेश / घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा. वसुली अधिकारी यांनी नोटिस बजावताना नोटिसीमध्ये त्यांचे नाव, पदनाम व भ्रमणदूरध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

१३. वसुली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तींनी किमान तीन वर्षांतून एकदा मान्यता प्राप्त संस्थेकडून तीन दिवसांचे वसुलीचे प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.

मिलिंद आकरे,

अपर निबंधक (त. व. नि.), सहकारी संस्था,

पुणे, २८ मे २०२५. महाराष्ट्र राज्य, पुणे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये

आदेश

क्रमांक ना.बँका/१-सआ/माढेश्वरी बँक/का.क.-१५६/१४९७/२०२५.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, मिलिंद आकरे, अपर निबंधक (तपासणी व निवडणूक) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये माढेश्वरी अर्बन डेव्हलपमेंट को-ऑप बँक लि., माढा या बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी

कलम ९८ व कलम १०१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्रांची अंमलबजावणीबाबत करावयाच्या कार्यवाहीपुरती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार खालील अटींस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते ३१ मार्च २०२६ पर्यंत शक्ती प्रदान करीत आहे.

परिशिष्ट

अ.क्र.	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नाव	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा	शक्तीची व्याप्ती	कार्यक्षेत्र जिल्हा
१	२	३	४	५
१.	श्री. राजकुमार शिवाजी भोळे	सिनीअर ऑफिसर	वसुली अधिकारी	सोलापूर, पुणे, उस्मानाबाद, सांगली.

अटी.—

१. वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा, कलम ९८ व १०१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

३. वसुली अधिकारी यांनी या कार्यालयाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार दरमाह विहित नमुन्यात कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना सादर करावी.

४. वसुली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सदर व्यक्ती सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सदर व्यक्तीस सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

६. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १५०४/प्र. क्र. २३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहांच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ६ जून २०१९ मध्ये निश्चित केलेल्या बँकेच्या नावाच्या मोहरेचा वापर करण्यात यावा.

७. वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हिल कोर्ट" "एक्झिक्युटिव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

८. वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "वसुली अधिकारी, माढेश्वरी अर्बन डेव्हलपमेंट को-ऑप बँक लि., माढा" असा फलक लावता येईल.

९. वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या / जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांच्याकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे, त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१०. वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ आणि त्याखालील नियम १०७ अन्वये आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

११. या कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या परिपत्रकीय सूचनांचे वसुली अधिकारी यांनी तंतोतंत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमाह वसुली अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाचमध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

१२. वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटिस / आदेश / घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा. वसुली अधिकारी यांनी नोटिस बजावताना नोटिसीमध्ये त्यांचे नाव, पदनाम व भ्रमणदूरध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

१३. वसुली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तींनी किमान तीन वर्षांतून एकदा मान्यता प्राप्त संस्थेकडून तीन दिवसांचे वसुलीचे प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.

मिलिंद आकरे,

अपर निबंधक (त. व. नि.),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, ४ जून २०२५.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये

आदेश

क्रमांक ना.बँका/१-सआ/पुणे पिपल्स बँक/का.क.-१५६/१५३१/२०२५.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, मिलिंद आकरे, अपर निबंधक (तपासणी व निवडणूक) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये पुणे पिपल्स को-ऑप बँक लि., पुणे या बहुराज्यीय बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी सदर बँकेने बहुराज्यीय सहकारी बँकेत रूपांतरित होणेपूर्वी वितरित केलेल्या कर्जाची वसुली करणेसाठी, उक्त बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९१ व कलम १०१ अन्वये प्राप्त केलेल्या वसुली दाखल्यांची महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम १०७ मधील तरतुदींनुसार अमंलबजावणी करणेसाठी, कसुरदाराची मालमत्ता जप्त करून तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकारी खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते ३१ मार्च २०२६ पर्यंत शक्ती प्रदान करीत आहे.

परिशिष्ट

अ.क्र.	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्यांचे नाव	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्यांचा हुद्दा	शक्तीची व्याप्ती	कार्यक्षेत्र जिल्हा
१	२	३	४	५
१.	श्री. तुषार राजाराम शिळीमकर	सहा. शाखा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
२.	श्री. किशोर पंडित तुपे	लेखनिक	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य

अटी.—

१. वसुली अधिकारी यांना सदरचे अधिकारी पुणे पिपल्स को-ऑप बँक लि., पुणे ही बँक बहुराज्यीय बँकेत रूपांतरित होण्यापूर्वी उक्त बँकेने अदा केलेल्या कर्ज प्रकरणापुरतेच वापरता येतील अन्यथा इतर प्रकारे सदर अधिकारांचा वापर करता येणार नाही.

२. सदरचे अधिकार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्यांची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

३. वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तत्काळ काढून घेण्यात येतील.

४. वसुली अधिकारी यांनी मालमत्तेच्या वाजवी किंमतीस (अपसेट प्राईस) निबंधकाची पूर्वमान्यता घेणे आणि मालमत्तेची विक्री कायम करणे या कामी या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.ना. बँका/डी-४/अपसेट प्राईस व विक्री कायम/२०१५/८७०, दिनांक १७ एप्रिल २०१५ अनुसार संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांची मान्यता घ्यावी. संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी उक्त बँकेच्या वाजवी किंमतीस (अपसेट प्राईस) पूर्वमान्यता देणे आणि मालमत्तेची विक्री कायम करणेसंबंधी प्रस्तावाबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार उचित कार्यवाही करावी.

५. वसुली अधिकारी यांनी दरमाह या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ अन्वये विहित केलेल्या नमुन्यात कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास सादर करावी.

६. अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवा निवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

७. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक १९४२/२०१३, दि बेसिन कॅथोलिक को-ऑप. बँक लि., विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ०५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेल्या आदेश विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारानुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

८. वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

९. शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १५०४/प्र.क्र. २३१/१५, स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यास तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

१०. वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हिल कोर्ट" "एक्झिक्युटिव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

११. वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "वसुली अधिकारी, पुणे पिपल्स को-ऑप बँक लि.पुणे (मल्टीस्टेट)" असा फलक लावता येऊ शकेल.

१२. वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या / जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांच्याकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे, त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१३. वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ आणि त्याखालील नियम १०७ अन्वये आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

१४. या कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या परिपत्रकीय सूचनांचे वसुली अधिकारी यांनी तंतोतंत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमाह वसुली अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाचमध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

१५. वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटिस / आदेश / घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा.

१६. एका वसुली अधिकाऱ्याकडे १०० पेक्षा अधिक वसुली प्रकरणे सोपविण्यात येऊ नयेत.

१७. वसुली अधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकारांची उपरोक्त मुदत संपणेपूर्वी तीन महिनेचे आंत अधिकाराचे नूतनीकरण करणेसाठीचा प्रस्ताव, नूतनीकरणाच्या समर्थनार्थ आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करणे बंधनकारक राहील .

मिलिंद आकरे,

अपर निबंधक (त. व. नि.),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, १२ जून २०२५.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये

आदेश

क्रमांक ना.बँका/१-सआ/रूपी बँक/का.क.-१५६/१६८९/२०२५.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, मिलिंद आकरे, अपर निबंधक (तपासणी व निवडणूक) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये रूपी को-ऑप. बँक लि., पुणे या बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी कलम ९८ व कलम १०१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्रांची अंमलबजावणीबाबत करावयाच्या कार्यवाहीपुरती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार खालील अटींस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते ३१ मार्च २०२६ पर्यंत शक्ती प्रदान करीत आहे.

परिशिष्ट

अ.क्र.	वुसली अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा	शक्तीची व्याप्ती	कार्यक्षेत्र जिल्हा
१	२	३	४	५
१.	श्री. संजय दिगंबर सावंत	शाखा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
२.	श्री. राजेंद्र पांडुरंग कंठाळे	व्यवस्थापक	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
३.	श्री. अभय श्रीनिवास केसकर	व्यवस्थापक	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
४.	श्री. प्रशांत गंगाधर काकडे	व्यवस्थापक	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
५.	श्री. नवल शंकर सालसकर	शाखा अधिकारी	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
६.	श्री. लक्ष्मण सखाराम बांगर	शाखा अधिकारी	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
७.	श्री. राजेश जनार्दन गुळेकर	व्यवस्थापक	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
८.	श्री. शरद रघुनाथ रासकर	अधिकारी	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
९.	श्री. संजीव तुकाराम माळी	अधिकारी	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
१०.	श्री. जितेंद्र मोहन मोझे	अधिकारी	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य

अटी.—

१. वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा, कलम ९८ व १०१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

३. वसुली अधिकारी यांनी या कार्यालयाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार दरमाह विहित नमुन्यात कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना सादर करावी.

४. वसुली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सदर व्यक्ती सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सदर व्यक्तीस सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

६. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १५०४/प्र. क्र. २३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहांच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ६ जून २०१९ मध्ये निश्चित केलेल्या बँकेच्या नावाच्या मोहरेचा वापर करण्यात यावा.

७. वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हिल कोर्ट" "एक्झिक्युटिव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

८. वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "वसुली अधिकारी, रूपी को-ऑप. बँक लि., पुणे" असा फलक लावता येईल.

९. वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या / जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांच्याकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे, त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१०. वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ आणि त्याखालील नियम १०७ अन्वये आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

११. या कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या परिपत्रकीय सूचनांचे वसुली अधिकारी यांनी तंतोतंत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमाह वसुली अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाचमध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

१२. वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटिस / आदेश / घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा. वसुली अधिकारी यांनी नोटिस बजावताना नोटिसीमध्ये त्यांचे नाव, पदनाम व भ्रमणदूरध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

१३. वसुली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तींनी किमान तीन वर्षांतून एकदा मान्यता प्राप्त संस्थेकडून तीन दिवसांचे वसुलीचे प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.

मिलिंद आकरे,
अपर निबंधक (त. व. नि.),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, १७ जून २०२५.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये

आदेश

